ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

संयुक्त राष्ट्र आणि भारताची भूमिका

** जाधव शंकर कुलदिप,*

** रयत शिक्षण संस्थेचे, आर.बी. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, अहिल्यानगर-४१३७०९.*

सारांश:

या संशोधनात संयुक्त राष्ट्र (UN) आणि भारताची भूमिका यांचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून पायाभूत विश्लेषण करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्र निर्मितीच्या पार्श्वभूमीचे विश्लेषण प्राधान्याने केले आहे.

संशोधनाचा प्रमुख उद्देश, हा संयुक्त राष्ट्र संदर्भात मूलभूत माहिती आणि संयुक्त राष्ट्रांतील भारताच्या भूमिकेचे आणि योगदानाचे सिंहावलोकन करणे आहे. प्रामुख्याने, संयुक्त राष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी आणि संयुक्त राष्ट्रात अधिकारपद भूषविलेल्या भारतीयांच्या यादींचे संक्षिप्त दृष्टिकोनातून प्रस्तुतीकरण करण्यात आले आहे.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

प्रस्तावना:

युरोपात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अगदी सतराव्या शतकापासून जे प्रयत्न केले गेले त्यात साधारणपणे १६४८ च्या वेस्टफलिया तहापासून ते पहिल्या महायुद्धानंतर निर्माण करण्यात आलेली राष्ट्रसंघ(League of Nations) पर्यंतची पार्श्वभूमी, संयुक्त राष्ट्राची(United Nations) निर्मिती करण्यात झाली.

राष्ट्रसंघाची(League of Nations) निर्मिती इ.स.१९१९ रोजी पॅरिस येथे करण्यात आली. पण राष्ट्रसंघातील अनेक दोषांमुळे ही संघटना युरोपातील राष्ट्रांमध्ये 'कायम शांततेची' कल्पना रुजवू शकली नाही. पण जागतिक स्तरावर 'संयुक्त राष्ट्रे(Union Nations)ची निर्मितीची संकल्पना निर्माण होण्यास मदत झाली. यातूनच ५१(सुरुवातीस ५० देश नंतर काही दिवसातच पोलंड ने सनद मंजूर केली)देशांनी स्वाक्षरी करून २४ ऑक्टोबर १९५४ रोजी अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथे संयुक्त राष्ट्रसंघाची रीतसर स्थापना झाली.

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या पूर्वी पासूनच भारताची जागतिक स्तरावरील भूमिका आंतरराष्ट्रीय सहयोगाची राहिली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थापक राष्ट्रांपैकी भारत हा एक राष्ट्र आहे. त्यामुळे भारताची संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका आणि योगदान सद्यस्थितीत प्रमुख स्थानी आहे.

भारताचे प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा प्रवास बघता, भारताने परराष्ट्रीय धोरणात मूलभूत परिस्थिती नुसार अमूलाग्र बदल केलेला दिसून येतो. तथागत गौतम बुद्धांपासून ते म.गांधी पर्यंतचा विचार करता विविध तज्ञांनी आणि

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

विद्वानांनी अहिंसेची आणि शांतताप्रिय तत्त्वांची मांडणी केलेली दिसून येते. भारताचे व संयुक्त राष्ट्राचे संबंध विश्वासाचे आणि सहकार्याचे आहे. भारताने संयुक्त राष्ट्रातील विविध परिषदा व समित्यांमध्ये जबाबदारीपूर्वक सहभाग घेऊन न्यायपूर्ण भूमिका साध्य केली आहे. भारताने आंतरराष्ट्रीय प्रश्न आणि सर्वांगीण व संतुलित विकास यांत कार्यात्मक भूमिका घेऊन विश्वगुरू बनण्याचे स्वप्न प्रभावी ठरत आहे.

२९ सप्टेंबर १९४६ ला पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताची संयुक्त राष्ट्राविषयीची भूमिका स्पष्ट केली त्याप्रमाणे, "Indian attitude towards the UN is that of whole hearted cooperation and unreserved adherence in both spirit and letter to the charter governing UN" ही भारताची भूमिका असेल. स्वातंत्र्यपूर्वकाळातच स्पष्ट केलेल्या या भूमिकेशी आजही भारत बांधील आहे.[1]

भारताने संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून पंचशील धोरण, शांती प्रस्थापना मोहिमा, मानवाधिकार संरक्षण, अण्वस्त्र नियंत्रण, पर्यावरण संवर्धन, आर्थिक व सामाजिक विकास तसेच दहशतवादाविरोधी कारवाई, निर्वसाहतीकरण आणि वंशवादविरोधी कारवाई इ. क्षेत्रांत मोलाचे योगदान दिलेले दिसून येते. भारताने लष्करी व नागरी उपाययोजनांचा वापर करून अनेक देशांमध्ये शांतता राखण्याचे काम केलेले आहे.

उद्दिष्टे:

1. संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून अभ्यास करणे.
2. संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या प्रारंभिक सहभागाचे विश्लेषण करणे.
3. संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा प्रक्रियेत भारताच्या प्रमुख भूमिकेचा ऐतिहासिक आढावा घेणे.
4. भारताचे संयुक्त राष्ट्र संघातील प्रमुख योगदान तपासणे.
5. संयुक्त राष्ट्रांतील भारतीय नेतृत्व आणि प्रतिनिधित्वाचा अभ्यास करणे.

गृहितके:

१. संयुक्त राष्ट्राच्या धोरणात्मक प्रक्रियेमध्ये भारताचा सहभाग सात्यतपूर्ण राहिला आहे.

२. संयुक्त राष्ट्रांतील भारताची भूमिका सतत नैतिक व मानवतावादी या तत्त्वांवर आधारित आहे.

३. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासूनच जागतिक शांतता आणि जागतिक सुरक्षिततेचा पुरस्कार केला आहे.

४.भारताने संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेपासूनच सहकार्यात्मक,सात्यतपूर्ण आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित भूमिका घेतली आहे.

५.संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये भारताची भूमिका ही प्रभावी आणि जबाबदारीपूर्ण राहिली आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

संयुक्त राष्ट्र स्थापनेचे ऐतिहासिक संक्षिप्त विश्लेषण:

पहिल्या महायुद्धात(१९१४-१९१८) जगातील बहुतांश देशांनी सहभाग घेतला होता. या युद्धात प्रचंड हानी झाली होती. या युद्धामुळे लाखो लोकांचे जीव गेले तसेच सामाजिक आणि आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले होते. यामुळेच परत या युद्धाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शांतता राखण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याची कल्पना मांडण्यात आली. त्यानंतर राष्ट्रसंघाची(League of Nations) स्थापना झाली. जागतिक शांतता आणि युद्धे टाळून जागतिक सहकार्य वाढवणे ही या राष्ट्रसंघाची प्रमुख उद्धिष्टे होती परंतु, राष्ट्रसंघाला ही उद्धिष्टे पूर्ण करण्यात यश आले नाही. यानंतर अनेक कारणांनी ही संघटना इ.स.१९३९ रोजी नष्ट करण्यात आली आणि दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली.

दुसरे महायुद्ध(१९३९-१९४५) चालू असतानाच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी आणि जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या(Third World War) धोक्यापासून वाचविण्यासाठी एका सक्षम आंतरराष्ट्रीय संघटना स्थापनेचा विचार पुढे आला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी १ जानेवारी १९४२ ला संयुक्त राष्ट्रे (United Nations) या संकल्पनेची घोषणा केली.(स्थापनेच्यावेळी जरी संयुक्त राष्ट्र संघटना असे नाव असले तरी पुढे त्यात बदल होऊन संयुक्त राष्ट्र हा शब्दप्रयोग करण्यात येऊ लागला.)

संयुक्त राष्ट्राच्या कल्पनेचे मुळ हे इ.स.१९४१ च्या अटलांटिक सनदेत दिसून येते. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट आणि ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्या दरम्यान न्यूफाउंडलंडजवळील प्लेसेंटिया येथे **RMS Queen Mary** या युद्धनौकेत एक बैठक झाली. या बैठकीत युद्ध रणनीतीबरोबरच युद्धोत्तर विश्वरचनेत आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्थेसाठी उपाययोजनात्मक धोरणांची चर्चा झाली. तसेच, या बैठकीत झालेल्या चर्चेच्या आधारावर एक आठ कलमी सनद बनविण्यात आली. जी अटलांटिक सनद (Atlantic Charter of 1941) या नावाने ओळखली जाते. संयुक्त राष्ट्राच्या कल्पनेला स्पष्ट रूप डंबार्टन ओक्स संमेलनातून प्राप्त झाले. या संमेलनात संयुक्त राष्ट्रांसाठी मसुदा तयार करण्यात यश आले. संघटनेचे स्वरूप कसे असावे, या संघटनेच्या घटनेत कोणत्या तरतुदींचा समावेश असावा याविषयी सविस्तर चर्चा वॉशिंग्टन येथे २१ ऑगस्ट ते ७ ऑक्टोबर १९४४ यादरम्यान पार पडली. या चर्चेतून ज्या तरतुदींचा समावेश केला त्यांना पुढे संयुक्त राष्ट्राच्या घटनेत समाविष्ट करण्यात आले. ११ फेब्रुवारी १९४५ मध्ये याल्टा येथे अमेरिका(रुझवेल्ट), ब्रिटन(चर्चिल) आणि सोव्हिएत रशिया(स्टॅलिन)च्या प्रतिनिधींची एक परिषद झाली. या याल्टा परिषदेत विविध विषयांवर सविस्तर चर्चा होऊन सुरक्षा परिषदेमध्ये अमेरिका आणि सोव्हिएत रशियामध्ये सहमती झाली. सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यांना नकाराधिकार(Veto Power) देण्याची कल्पना याच परिषदेत मांडण्यात आली. नकाराधिकाराच्या या विशेषाधिकाराचा समावेश पुढे संयुक्त राष्ट्राच्या घटनेत करण्यात आला आणि जर्मनीवर नियंत्रण ठेवण्याचे धोरण मान्य करण्यात आले. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

दिशेने अंतिम पाऊल पडले ते सॅन फ्रान्सिस्को परिषदेच्या रूपाने.

२२ एप्रिल ते २६ जून १९४५ या दरम्यान सॅन फ्रान्सिस्को येथे ही परिषद भरविण्यात आली. या परिषदेला ५० राष्ट्रांचे २८२ प्रतिनिधी उपस्थित होते. यात सुरक्षा परिषदेतील ५(अमेरिका, चीन, फ्रान्स, ब्रिटन आणि सोव्हियत रशिया) कायम सदस्य राष्ट्रांच्या नावांची निश्चिती झाली. सनदेतील बहुतांश भाग २/३ मतांनी मंजूर करण्यात आला. २४ ऑक्टोंबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर स्वाक्षऱ्या करून त्याला मान्यता देण्यात आली. तसेच २४ ऑक्टोंबर १९४५ ला संयुक्त राष्ट्राची औपचारिकदृष्ट्या निर्मिती झाली.[1]

संयुक्त राष्ट्रसंघाविषयी मूलभूत माहिती:

अ)अनुच्छेद:१- संयुक्त राष्ट्रांचे उद्दिष्टे (Purposes) स्पष्ट करतात.

१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखणे.

२. राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे.

३.आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रोत्साहित करणे.

४.या सामान्य उद्दिष्टांच्या साध्यतेसाठी राष्ट्रांच्या कृतींमध्ये सुसंवाद साधणारे केंद्र बनणे.[2]

ब)अनुच्छेद:२- संयुक्त राष्ट्राचे मूलभूत तत्वांनुसार कार्य स्पष्ट करतात-

१. ही संघटना तिच्या सर्व सदस्यांच्या सार्वभौम समानतेच्या तत्त्वावर आधारित आहे.

२.सदस्य राष्ट्रांची प्रामाणिक(जबाबदारी पूर्ण)बांधिलकी.

३.विवादांचे शांततामय निराकरण.

४.कोणत्याही राष्ट्राच्या प्रादेशिक अखंडतेवर किंवा राजकीय स्वातंत्र्यावर धमकी देणे किंवा बलाचा वापर करणे टाळावे.

५.संयुक्त राष्ट्रांना मदत करण्याचे बंधन.

६.शांततेच्या दृष्टीने गरज पडल्यास, असदस्य राष्ट्रांनीही या तत्त्वांचे पालन करावे.

७.अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, परंतु आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण करू नये.[3]

संयुक्त राष्ट्राच्या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण बाबी-:

१. १ जानेवारी १९४२ रोजी 'United Nations' हे नाव अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट यांनी दिले होते.

२. इंग्रजी आणि फ्रेंच या भाषा संस्थेच्या प्रमुख कार्यभाषा आहेत.

३. या व्यतिरिक्त, चिनी, स्पॅनिश, रशियन आणि अरबी या भाषांना अधिकृत मान्यता आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

४. घोषणापत्रात सुमारे, शब्द-१०,०००, अनुच्छेद-१११ आणि अध्याय-१९ आहेत.

५. महासचिव(Secretary General) हा संयुक्त राष्ट्र संघाचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असतो[4]

संयुक्त राष्ट्रात भारताची भूमिका:

भारताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या विभिन्न अंगात कार्यात्मक भूमिका घेऊन महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारत संयुक्त राष्ट्राच्या विविध समित्या आणि परिषदांवर सदस्य आहे. ३० ऑक्टोंबर १९४५ रोजी भारताचा संयुक्त राष्ट्र संघटनेचा ५१वा मूळ संस्थापक सभासद राष्ट्र म्हणून प्रवेश स्वीकारण्यात आला. त्यामुळे भारत संयुक्त राष्ट्राचा संस्थापक सदस्य आहे. भारत आणि संयुक्त राष्ट्रातील संबंध हे सहकार्यात्मक स्वरूपाचे दिसून येतात याचे कारण असे की, भारताचे वसुधैव कुटुंबकम तत्वज्ञान, अहिंसेचा आणि सहिष्णुतेचा विचार आणि प्रचार, तसेच शांततापूर्ण विचारसरणी इ. होय. त्यासोबतच तथागत गौतम बुद्धापासून ते म.गांधीपर्यंतचे विचारवंत हे अहिंसेचे आणि शांततापूर्ण विचारसरणींचे अनुकरण करण्यास प्रोत्साहन करतात. भारत ८ वेळा सुरक्षापरिषदेत अस्थाही सदस्य म्हणून निवडून आला आहे-(१९५०-१९५१,१९६७-६८,१९७२-७३,१९७७-७८,१९८४-८५,१९९१-९२,२०११-१२ आणि २०२१-२२). सद्यस्थितीत,भारताने या सुरक्षा परिषदेत पुनर्रचना करण्याची भूमिका दर्शवली आहे. संयुक्त राष्ट्राच्या शांतिसैनिक मोहिमांमध्ये(Peacekeeping Operations) भारताने मनुष्यबळाच्या रूपाने सर्वाधिक योगदान दिले आहे. भारताने या मोहिमांतर्गत ५० पेक्षा अधिक देशांत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे योगदान दिले आहे. भारत हा महिला पोलिस पथक पाठवणारा पहिला देश ठरला आहे. भारताने Unite Aware हा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्यास मदतीची भूमिका दाखवली असून, या मुळे शांतिसैनिक मोहिमा अधिक पारदर्शक आणि सुरक्षित झाल्याचे दिसून येते.

जून,१९५४ ला भारताचे तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू आणि चीनचे पंतप्रधान झोऊ-एन-लाई यांनी संयुक्तपणे पंचशील धोरणाची घोषणा केली. भारताचे शांततामय सहजीवनाचे तत्व या पंचशील धोरणाचा आधार आहे आणि हे धोरण संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत भारताच्या पुढाकाराने मांडण्यात आले. या धोरणांतर्गत शांततामय सहजीवन आणि आक्रमणाचा विरोध या तत्वांचा समावेश करण्यात आला आहे. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासूनच सुरू झालेल्या निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेत भारताने महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. तसेच वसाहत निर्मूलनाचा भारताचा स्पष्ट दृष्टीकोन स्वातंत्र्यपूर्व काळापासून दिसून येतो.भारताचे वंशवादाला विरोध करणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. संयुक्त राष्ट्राच्या सदस्यांपैकी भारत एक असा देश आहे, ज्याने दक्षिण आफ्रिकेतील वंशवादी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या शासनाचा निषेध केला. वंशवादाविरोधी जागतिक जनमत वाढवण्यात भारताचे योगदान महत्त्वाचे आहे.संयुक्त राष्ट्राच्या व्यासपीठावरून भारताने संपूर्ण निःशस्त्रीकरणाचा आग्रह सातत्याने धरला आहे. भारताचे निःशस्त्रीकरण हे परराष्ट्र धोरणातील महत्वपूर्ण तत्व आणि

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

धोरण राहिले आहे.भारताचे सामाजिक न्याय आणि मानवाधिकारात विशेष योगदान राहिले आहे. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेमध्ये २०२६-२०२८ या काळासाठी भारताची 7 व्यांदा निवड झाली आहे. भारताने मानवी संरक्षण आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. संयुक्त राष्ट्रांनी संपूर्ण जगाचा संतुलित व सर्वांगीण विकास साधण्यासाठी 2015 मध्ये १७ शाश्वत विकास ध्येये(SDGs) जाहीर केली. ही १७ ध्येये 2030 पर्यंत साध्य करण्याचा संकल्प सभासद देशांनी केला आहे. भारताने यासाठी आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संरक्षण, दारिद्र्य निर्मूलन आणि हवामान नियंत्रणावर पुढाकार घेऊन संयुक्त राष्ट्र संघाच्या उद्धिष्टांशी सुसंगत उपाययोजनांचा आदर्श संपूर्ण जगासमोर ठेवला आहे.

भारताने जागतिक स्तरावर अनेक संघर्ष टाळण्यासाठी विशेष प्रत्यत्न केल्याचे दिसून येते. त्यात प्रामुख्याने व्हिएतनाम युद्ध, कोरिया युद्ध, कांगो संघर्ष, बर्लिन संघर्ष, सुवेझ कालवा प्रश्न तसेच दक्षिण आफ्रिका संघर्ष आणि अरब-इस्रायल संघर्ष अशा प्रकारचे अनेक प्रश्नांमध्ये भारताची भूमिका समन्वयाची आणि शांततेची राहिलेली दिसून येते. अमेरिकेचे माजी परराष्ट्र मंत्री हेन्री किसिंजर यांनी, भारताचे खुल्या मनाने कौतुक केले आणि भारत एक प्रभावी शक्ती राष्ट्र असून त्याला संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व मिळाले पाहिजे अशी आशा व्यक्त केली आहे. भारतामध्ये खूप परिवर्तन झाले असून भारताच्या परराष्ट्र धोरणाचे त्यांनी कौतुक केले आहे.[5]

सारांश रूपाने,भारताने संयुक्त राष्ट्रांच्या अनेक परिषदांमध्ये सहभाग घेऊन सातत्याने लोकशाही आणि शांततात्मक धोरणांची अंमलबजावणी केलीली दिसून येते. भारताच्या परराष्ट्र धोरणांच्या अनुषंगाने भारताने संयुक्त राष्ट्र संघात प्रभावी भूमिका बजावून उल्लेखनीय स्थान प्राप्त केलेले आहे.

➢ **संयुक्त राष्ट्रात अधिकारपद भूषविलेले प्रमुख भारतीय-:**

भारतीयांचे नाव-	भूषविलेले पद
• विजयालक्ष्मी पंडित	- आमसभेच्या अध्यक्ष
• डॉ. एस. राधाकृष्णन	- युनेस्कोचे अध्यक्ष
• मौलाना अबुल कलाम आझाद	- युनेस्कोचे अध्यक्ष
• राजकुमारी अमृत कौर	- विश्व आरोग्य संघटनेचे अध्यक्षपद
• व्ही. आर. सेन	- FAO चे अध्यक्ष
• होमी भाभा	- अध्यक्ष,शांततेसाठी अणु आयोग
• टी. एस. तिरुमूर्ती	- भारताचे स्थायी प्रतिनिधी, UN

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

- डॉ. एस. जयशंकर - महासभेत प्रमुख वक्ते, UNGA[6]

निष्कर्ष:

भारताचे परराष्ट्र धोरण आणि संयुक्त राष्ट्राचे तत्वज्ञान यात बहुतांश प्रमाणात साम्य दिसून येते. सद्यस्थितीत, भारत संयुक्त राष्ट्राच्या कार्यात विशेष लक्ष देत असून जागतिक स्तरावर भारताच्या भूमिकेचे आणि योगदानाचे विशेष कौतुक केले जात आहे. भारताने पंचशील धोरण, सुरक्षा परिषद आणि शांतिसैनिक मोहिमांमध्ये संयुक्त राष्ट्रांत सहकार्यात्मक भूमिका घेतलेली जाणवते. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून सर्वांगीण व संतुलित विकास ह्यांवर विशेष कार्य केलेले संशोधनावरून दिसून येते.

संयुक्त राष्ट्रात भारतीयांनी प्रमुख अधिकारपद भूषवलेली आहे. यातूनच लोकशाही व शांततात्मक मूल्यांचा सदुपयोग करून राष्ट्रा-राष्ट्रांतील प्रश्न सोडवण्यासाठी भारताची भूमिका महत्वाची मानली जात आहे. सद्यस्थितीत, जागतिक स्तरावर भारताचे स्थान क्रमप्राप्त यादीत प्रमुख असल्याचे मान्य करावे लागेल.

संदर्भ ग्रंथ:

1. *डॉ.देवळाणकर शैलेंद्र. संयुक्त राष्ट्रे-आंतरराष्ट्रीय राजकारणाची बदलती समीकरणे आणि संयुक्त राष्ट्राची भूमिका. पुणे:प्रतिमा प्रकाशन, २००८.*
2. *प्रा.बी.वाय.कुलकर्णी आणि प्रा.नाईकवाडे अशोक. आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांत आणि व्यवहार. पुणे:श्रीविद्या प्रकाशन, २००४.*
3. *प्रा. इंदापवार दि.वा. आणि प्रा. देशपांडे श्री.वि. संयुक्त राष्ट्रसंघ, नागपूर:श्री मंगेश प्रकाशन, १९८८.*
4. *डॉ. शिंदे ज.रा. भारताचे परराष्ट्रीय धोरण. औरंगाबाद:कैलास पब्लिकेशन्स.*
5. *प्रा. रायपूरकर. व.र. आंतरराष्ट्रीय संबंध. नागपूर:श्री.मंगेश प्रकाशन, १९७५.*
6. *प्रा. देशपांडे श्री.वि. भारताची विदेश नीती. नागपूर:श्री.मंगेश प्रकाशन, १९९०.*

Cite This Article:

जाधव शं. कु. **(2025).** *संयुक्त राष्ट्र आणि भारताची भूमिका.* **In Educreator Research Journal: Vol. XII (Issue VI),** pp. 183–189. **Doi: https://doi.org/10.5281/zenodo.18397988**